जातात. या चार पर्यायामधून वाचकांनी योग्य त्या एका पर्यायाची उत्तर म्हणून निवड करायची आहे. आपले उत्तर चूक की बरोबर याची शहानिशा करण्यासाठी प्रकरणाच्या शेवटी प्रश्नाच्या उत्तराची सूची दिलेली आहे. यावरून आपण शोधलेले उत्तर योग्य आहे किंवा नाही याची खात्री वाचकांना करून दिली जाते.

उदा. महाराष्ट्रातील बराचसा भू-भाग .... या अग्निजन्य प्रकारच्या खडकापासून बनलेला आढळतो. असा प्रश्न विचारून पुढे चार प्रकारचे पर्याय दिलेले आहेत.
१) सिलिकॉन २) ग्रॅनाईट ३) अँथ्रासाईट ४) बेसॉल्ट अशा चार पर्यायामधून योग्य पर्यायाची निवड करायची आहे. सामान्य वाचकालाही आकलन होईल अशा भाषेतून प्रश्नांची मांडणी झालेली आहे. यामुळे वाचकांची जिज्ञासा जागृत होते व त्या अनुषंगाने अधिक वाचनाचा प्रयत्न होताना दिसतो.

सामान्य ज्ञान ही समाजाची एक गरज आहे. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने ती निर्माण झाली आहे. तसेच सामान्य ज्ञानामुळे व्यक्तीच्या जाणीवांमध्ये वाढ झालेली दिसते. जीवन जगताना प्रत्येक ठिकाणी सद्सद्विवेक बुध्दी जागृत ठेवावी लागते. तरच माणसाला महत्व प्राप्त होते. आपण ज्या देशामध्ये जन्म घेतला आहे त्या देशाविषयीची माहिती आपल्याकडे असणे गरजेचे आहे. अशी माहिती मिळविण्यासाठीही सामान्य ज्ञानाची पुस्तके वाचली जातात. उदा. आपल्या ग्रहमालेसंबंधीचे ज्ञान जाणून घ्यायचे असेल तर सामान्य ज्ञानाच्या पुस्तकामध्ये अशी माहिती उपलब्ध होते. शनी ग्रहाविषयी सर्वसामान्य जनतेमध्ये अनेक प्रकारचे समज आहेत व भीतीही आहे. परंतु हा ग्रह नेमका आहे तरी कसा या संबंधीचे विवेचन सामान्य ज्ञानाच्या पुस्तकात मिळते. पृथ्वीवरून धुरकट निळसर दिसणाऱ्या 'शनी' या ग्रहाभोवती आढळणारी कडी हे या ग्रहाचे वैशिष्ट्ये म्हणता येईल. यापूर्वी शनीला एकूण तीस उपग्रह असल्याचे आपणास ज्ञात होते. तथापि 'कॅसिनो' यानाने पुरविलेल्या नव्या माहितीनुसार शनीस एकूण साठ उपग्रह असल्याचे माहिती झाले. तत्पूर्वी शनीचे त्रेचाळीस उपग्रह जगाला ज्ञात होते. शनी या ग्रहाचा शोध लावण्याचे श्रेय गॅलिलिओ या शास्त्रज्ञास दिले जाते. अशा पध्दतीची माहिती सामान्य ज्ञानाच्या पुस्तकातून वाचकांना सहज व सोप्या भाषेतून दिली जाते.

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. अशा लोकशाहीचे ,कामकाज कशा प्रकारे चालते. हे बहुतेकांना माहितीही नसते. लोकशाहीतील महत्वाचा घटक मतदार असला तरी, त्याच्याकडून निवडून दिलेले सदस्य व त्यांच्यामार्फत होणाऱ्या कामकाजातील घटकांसबंधीची माहिती आवश्यक असते. भारतीय राज्यघटनेच्या तरतुदीनुसार लोकशाहीतील विविध पदांसाठी विशिष्ट अशी पात्रता निश्चित करण्यात आली आहे. बऱ्याचवेळा याविषयी अनेकांना माहिती नसते. एखादा प्रश्न त्यांना विचारला तर ते सहजपणे निरूत्तर होतात. अशा वेळी सामान्यज्ञान असणे आवश्यक आहे.

सामान्य ज्ञानाच्या पुस्तकातून साधारणपणे महाराष्ट्र भौगोलिक व अनुषंगिक, महाराष्ट्र योजना, विकास व कल्याण, भारत - भौगोलिक व अनुषंगिक, भारत अर्थ, योजना, उद्योग व विकास, भारत सामान्यमाहिती, पृथ्वी जगातील विभाग, हवामान अक्षांस-रेखांश, भारतीय राज्यघटना, आधुनिक भारताचा इतिहास, प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास, सामान्य विज्ञान, संत व समाजसुधारक, ग्रामीण प्रशासन, मराठी साहित्य, विज्ञान त्याच बरोबर माणसाच्या विविध अंगाना स्पर्श करणारी माहिती, जीवनाशी निगडीत सर्वच क्षेत्राची माहिती सामान्य ज्ञानाच्या पुस्तकातून मिळते. एखादा प्रश्न मांडण्यापूर्वी त्यातील घटकांची माहिती करून देणे व दिलेल्या माहितीच्या आधारे प्रश्नांची उकल करणे हे सामान्य ज्ञानासंबंधीच्या पुस्तकातून मांडलेले दिसते. एखाद्या क्लिष्ट घटकाची माहितीही सोप्या आणि सहज आकलन होईल अशा भाषेतून मांडणी झालेली आहे. त्यामुळे सामान्य ज्ञाना संबंधीची जिज्ञासापूर्ती होण्यासाठी असे साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण होवू लागले आहे.